IIPIMRJ | IIP International Multidisciplinary Research Journal

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 03 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# ‘जागतिक ऐतिहासिक प्रक्रिया आणि लोकशाही संक्रमण’

[1]भिमा दिगंबर शिंदे, [2]प्रा. डॉ. हरी नारायण जमाले

संशोधक विद्यार्थी, चिस्तिया कला, वाणिज्य व विज्ञान, महाविद्यालय खुल्दाबाद

मार्गदर्शक, चिस्तिया कला, वाणिज्य व विज्ञान, महाविद्यालय खुल्दाबाद

**Article Info**

***Article History:***
Received: 24th January 2026
Accepted: 01st February 2026
Published: 05th February 2026

***Keywords:***

*लोकशाही*

**ABSTRACT**

जागतिक ऐतिहासिक प्रक्रिया आणि लोकशाही संक्रमण म्हणजे एका हुकूमशाही सत्तेकडून लोकशाहीकडे होणारा राजकीय बदल होय. अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांतीने जगाच्या ऐतिहासिक प्रक्रिया लोकशाही मार्गाने संक्रमण होण्यास मदत झाली. यानंतरच्या काळात जागतिकीकरणामुळे जग जवळ आले ज्यामध्ये निवडणुका, राजकीय पक्ष, घटना हा एक गुंतगुंतूंचा संघर्षमय आणि पूर्णपणे चढउतार दिसतो परंतु यातून लोकशाही मजबूत होत असते. लोकशाही सामान्यत: प्राचीन ग्रीकांच्या प्रयत्नाशी संबंधित आहे.

लोकशाही ही एक राजकीय प्रणाली आहे, किंवा एखाद्या संस्था, संघटना किंवा राज्यामधील निर्णय घेण्याची एक प्रणाली आहे, ज्यामध्ये सदस्यांना सत्तेत वाटा असतो.आधुनिक लोकशाही त्यांच्या नागरिकांच्या दोन क्षमतांमुळे ओळखल्या जातात, ज्या त्यांना सरकारच्या पूर्वीच्या स्वरूपांपेक्षा मूलभूतपणे वेगळे करतात: समाजात हस्तक्षेप करणे आणि त्यांच्या सार्वभौम उदा. त्यांचे प्रतिनिधी यांना त्यांच्यासारख्याच इतर सरकारांच्या आंतरराष्ट्रीय कायद्यांना जबाबदार धरणे. लोकशाही सरकारची तुलना अल्पजनशाही आणि राजेशाही प्रणालींशी केली जाते.

मॉन्टेस्क्यूसारख्या विचारवंतांनी पाश्चात्य संस्कृतीचे संस्थापक मानले. या व्यक्तींनी या सुरुवातीच्या लोकशाही प्रयोगांचा उपयोग राजेशाहीनंतरच्या राजकीय संघटनेसाठी एक नवीन नमुना तयार करण्यासाठी करण्याचा प्रयत्न केला.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: February 02, 2026
Similarity Index: 5%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Shinde, B. D., & Jamale, H. N. (2026).** ‘जागतिक ऐतिहासिक प्रक्रिया आणि लोकशाही संक्रमण’. *IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 3(1), 679–682.*

## ❖ प्रस्ताविक

जागतिक ऐतिहासिक प्रक्रिया आणि लोकशाही संक्रमण म्हणजे एका हुकूमशाही सत्तेकडून लोकशाहीकडे होणारा राजकीय बदल होय. अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांतीने जगाच्या ऐतिहासिक प्रक्रिया लोकशाही मार्गाने संक्रमण होण्यास मदत झाली. यानंतरच्या काळात जागतिकीकरणामुळे जग जवळ आले ज्यामध्ये निवडणुका, राजकीय पक्ष, घटना हा एक गुंतगुंतूंचा संघर्षमय आणि पूर्णपणे चढउतार दिसतो परंतु यातून लोकशाही मजबूत होत असते. लोकशाही सामान्यत: प्राचीन ग्रीकांच्या प्रयत्नाशी संबंधित आहे.

लोकशाही ही एक राजकीय प्रणाली आहे, किंवा एखाद्या संस्था, संघटना किंवा राज्यामधील निर्णय घेण्याची एक प्रणाली आहे, ज्यामध्ये सदस्यांना सत्तेत वाटा असतो.आधुनिक लोकशाही त्यांच्या नागरिकांच्या दोन क्षमतांमुळे ओळखल्या जातात, ज्या त्यांना सरकारच्या पूर्वीच्या स्वरूपांपेक्षा मूलभूतपणे वेगळे करतात: समाजात हस्तक्षेप करणे आणि त्यांच्या सार्वभौम उदा. त्यांचे प्रतिनिधी यांना त्यांच्यासारख्याच इतर सरकारांच्या आंतरराष्ट्रीय कायद्यांना जबाबदार धरणे. लोकशाही सरकारची तुलना अल्पजनशाही आणि राजेशाही प्रणालींशी केली जाते.

मॉन्टेस्क्यूसारख्या विचारवंतांनी पाश्चात्य संस्कृतीचे संस्थापक मानले. या व्यक्तींनी या सुरुवातीच्या लोकशाही प्रयोगांचा उपयोग राजेशाहीनंतरच्या राजकीय संघटनेसाठी एक नवीन नमुना तयार करण्यासाठी करण्याचा प्रयत्न केला.

## ❖ संशोधनाचा उद्देश

1. जागतिक ऐतिहासिक प्रक्रियांचा लोकशाही संक्रमणावर झालेला प्रभाव अभ्यासणे.
2. विविध देशांतील लोकशाही संक्रमणाच्या प्रक्रियांची तुलना करणे.
3. वसाहतवाद, औद्योगिकीकरण, जागतिकीकरण आणि शीतयुद्ध यांसारख्या ऐतिहासिक घटकांचा लोकशाही विकासाशी असलेला संबंध स्पष्ट करणे.
4. लोकशाही संक्रमणात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटकांची भूमिका विशद करणे.
5. विकसनशील देशांतील लोकशाही संक्रमणाच्या अडचणी आणि संधी समजून घेणे.

## ❖ गृहितके

1. जागतिक ऐतिहासिक प्रक्रिया लोकशाही संक्रमणाला गती देतात किंवा अडथळे निर्माण करतात.
2. औद्योगिकीकरण आणि आर्थिक विकास झालेल्या देशांमध्ये लोकशाही संक्रमण अधिक स्थिर असते.
3. वसाहतवादी वारसा असलेल्या देशांमध्ये लोकशाही संक्रमण अधिक गुंतागुंतीचे आढळते.
4. जागतिकीकरणामुळे लोकशाही मूल्यांचा प्रसार वाढलेला आहे.
5. मजबूत नागरी समाज असलेल्या देशांमध्ये लोकशाही संक्रमण यशस्वी होते.

## ❖ संशोधन पद्धती

सदर संशोधनासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर संबंधित संशोधन लेखात करण्यात आला आहे.

## ❖ जागतिक ऐतिहासिक प्रक्रिया आणि लोकशाही

जागतिक ऐतिहासिक प्रक्रिया म्हणजे मानव समाजाच्या दीर्घकालीन राजकीय, सामाजिक आणि आर्थिक घडामोडी. औद्योगिक क्रांतीमुळे मध्यमवर्गाचा उदय झाला आणि लोकशाही विचारांना चालना मिळाली. वसाहतवादामुळे अनेक देशांमध्ये आधुनिक राज्यसंस्था निर्माण झाल्या, परंतु त्याचबरोबर हुकूमशाही प्रवृत्तीही रुजल्या.

शीतयुद्ध काळात अनेक देशांमध्ये लोकशाही ऐवजी सत्तावादी शासन पद्धती स्वीकारल्या गेल्या. शीतयुद्धानंतर लोकशाही संक्रमणाची तिसरी लाट उदयास आली.

जागतिकीकरणामुळे मानवाधिकार, स्वातंत्र्य आणि लोकशाही मूल्यांचा जागतिक स्तरावर प्रसार झाला. तथापि, आर्थिक विषमता आणि राजकीय अस्थिरता यामुळे काही देशांमध्ये लोकशाही संक्रमण अडथळ्यात सापडले.

कोणत्याही व्यवस्थेत परिवर्तनाची सुरुवात होत असते ती फक्त वैचारिकेतूनच जॉन लॉक आणि रुसो यासारख्या विचारवंतांनी राजकीय समता आणि स्व शासनाचे विचार मांडले म्हणजे रुसो सारखा विचारवंत जन्माला आला नसता तर फ्रेंच राज्य क्रांती झालीच नसती हे मत मांडले गेले ते योग्यच ठरते. ज्यांनी जगाला स्वातंत्र्य, समता, मानवता ही लोकशाहीची मूल्य दिली. या वैचारिकतेतुनच लोकशाहीचा पाया भक्कम उभा राहिला. याची सुरुवात इंग्लंडच्या मॅग्नाकार्टा पासून झाली असली तरी त्यास भक्कम पणा आला तो फक्त अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांतीमुळेच जागतिकीकरणामुळे जग एकमेकांशी जोडल्या गेले. जगातील कोणत्याही देशातील घटना किंवा प्रसंग घडला तर त्या घटनाचे परिणाम जगावर होतो. आणि यातून लोकशाही करण्याची बाजू बळकट होत जाते.

❖ **लोकशाही संक्रमणातील महत्त्वाचे घटक**

1. **नागरिकांचा सहभाग**

लोकशाही ही केवळ शासन पद्धती नसून जीवन पद्धती आहे शासन पद्धती म्हणून लोकशाहीचे यश अपयश हे ती जीवनपद्धती म्हणून समाजात किती रुजली आहे यावरही अवलंबून असते. लोकशाही संकल्पनेचे मूल्य समाजाच्या समग्र जगण्यात आल्याशिवाय लोकशाहीची ध्येय गाठता येते असे म्हणता येत नाही. लोकशाहीमध्ये प्राथमिकता ही लोकांची असते. लोकशाहीमध्ये मूल्य रुजवायची असेल तर नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद व सहभाग हा महत्त्वाचा मानला जातो.

लोकशाहीमध्ये कोणत्याही बदलांचा सर्व समावेशकता ही नागरिकांमध्ये असते. ही सहभागता दबाव तंत्रातून व खोल्यातून होत असते.

2. **मध्यमवर्ग**

लोकशाही यशस्विता मध्ये मध्यमवर्ग हा महत्त्वाचा मानला जातो मध्यमवर्ग लोकशाही संक्रमणास मदत करतात लोकशाहीत वैचारिकता निर्माण करणे क्षमता ही मध्यमवर्गाकडेच असते यातून लोकशाही बळकट होत असते.

3. **कायद्याचे राज्य**

लोकशाहीत सर्वात महत्त्वाचे असते ते म्हणजे कायद्याचे राज्य कायद्यासमोर सर्व समान असतात स्वतंत्र न्यायपालिका हे लोकशाहीचे महत्त्वाचे स्तंभ आहेत लोकशाहीत नागरिकांच्या हक्काचे रक्षण करण्याची जबाबदारी न्यायपालिकेवर असते.

4. **सत्तेचे विकेंद्रीकरण**

लोकशाहीमध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण होणे महत्त्वाचे असते यामध्ये कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्याय मंडळ ही तिन्ही मंडळाचे विकेंद्रीकरण होते यातून प्रतिसाद आणि उत्तरदायित्व वाढते व स्थानिक सहभागाला प्रोत्साहन देते आणि विविध स्थानिक गरजा पूर्ण करते.

5. **निष्पक्ष निवडणुका**

लोकशाहीमध्ये मालकी हक्क हा लोकांचा असतो त्यामुळे लोक आपले प्रतिनिधी संसदेत पाठवतात व हे प्रतिनिधी सर्व जनतेचे प्रतिनिधित्व करतात लोकशाहीमध्ये निष्पक्ष पद्धतीने निवडणुका पार पडतात आणि त्यातून जनता आपला प्रतिनिधी निवडतात. निवडणुकीचे निकाल सर्व पक्षांनी स्वीकारावे हा लोकशाही नियमावलीतील विश्वासाचा पुरावा असतो.

6. **संविधान**

लोकशाहीमध्ये जी स्थिरता प्राप्त होत असते ती फक्त लिखित संविधानामुळे. लोकशाहीमध्ये सर्वांचे स्थान विशिष्ट पातळीवर समायोजित केलेले असते. लिखित घटनांमुळे कोणताही घटकांचा आपापसात संघर्ष न होता घटनेप्रमाणे स्थान निश्चित

केलेली असते. त्यामुळे संविधान हे लोकशाहीत महत्त्वाचे मानले जाते.

**7. राजकीय पक्ष**

संसदीय कायदेमंडळात ज्या पक्षाला निवडणुकीमध्ये स्पष्ट बहुमत मिळते त्या राजकीय पक्षाचे सरकार स्थापन होत असते व ज्या पक्षाला बहुमत मिळत नाही तो पक्ष विरोधी पक्ष म्हणून ओळखला जातो निवडणुका आणि अधिकाराचा विस्तार यात राजकीय पक्षांची भूमिका महत्त्वाची असते.

## ❖ सारांश

लोकशाही ही एक जीवन पद्धती आहे. तो एक राज्यघटनेचा व राज्यव्यवस्थेचा प्रकार आहे. सामाजिक जीवनाच्या आवश्यकतेतून–अपरिहार्यतेतून जीवन व्यतीत करण्याच्या ज्या काही विचारप्रणाल्या आणि आचारधर्म प्रसृत झाले, त्यांपैकी लोकशाही ही एक आहे . लोकशाहीस काही अंशी पूरक असे प्रयोग प्राचीन ग्रीसमधील नगरराज्यांत, विशेषतः अथेन्समध्ये, इ.स.पू. पाचव्या शतकात झाले ग्रीकांप्रमाणे प्राचीन रोमनांनी प्रजासत्ताकद्वारे रोममध्ये लोकशाहीचा प्रयोग केला. प्राचीन ग्रीस व रोमप्रमाणे भारतातही काही प्रदेशांत साक्षात लोकशाहीचा प्रयोग झाला होता. वेदोत्तर काळापासून गुप्तकाळापर्यंत राजाविरहित गणराज्ये होती. त्यांचे उल्लेख जैन, बौद्ध साहित्यातून तसेच महाभारत, कौटिलीय अर्थशास्त्र, ऐतरेय ब्राह्मण आणि ग्रीक लेखकांच्या वृतांतून मिळतात. लोकशाहीचा प्रगल्भ विचार उत्क्रांत होण्यामागे अनुभववादाचा वाटा मोठा आहे. लोकशाही जीवनपद्धती आणि तत्त्वज्ञान यांच्या विकासातील ते एक मूलतत्त्व आहे. यूरोपातील लोकशाहीवादी चळवळी ह्या सामाजिक सुधारणांच्या चळवळी होत्या. त्यांनी लोकशाहीच्या मूल्यांबाबत अनुभववादी तत्त्वज्ञान स्वीकारले.

## ❖ निष्कर्ष

1) जागतिक ऐतिहासिक प्रक्रिया आणि लोकशाही संक्रमण यांच्यात घनिष्ठ संबंध आहे. लोकशाही संक्रमण ही एकसारखी प्रक्रिया नसून ती प्रत्येक देशाच्या ऐतिहासिक, सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमीवर अवलंबून असते.
2) आर्थिक विकास, शिक्षण, नागरी समाज आणि आंतरराष्ट्रीय दबाव हे लोकशाही संक्रमणासाठी महत्त्वाचे घटक आहेत.
3) तथापि, केवळ जागतिक प्रभाव पुरेसा नसून अंतर्गत राजकीय इच्छाशक्ती आणि संस्थात्मक स्थैर्य आवश्यक आहे. त्यामुळे लोकशाही संक्रमण समजून घेण्यासाठी जागतिक आणि स्थानिक घटकांचा समन्वित अभ्यास करणे अत्यावश्यक ठरते.

## ❖ संदर्भ :

1) कठारे अनिल, आधुनिक जगाचा इतिहास,प्रशांत पब्लिकेशन, जळगाव. जानेवारी 2013.
2) वाघमारे माधव केरवा,लोकशाही प्रक्रिया व जाती संस्था, अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव. 17 डिसेंबर 2024.
3) कोठे प्रशांत, आधुनिक जगाचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन,जळगाव.29 जुलै 2020.
4) कोलारकर श.गो, आधुनिक जग, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर. जून 2005.
5) नायर दीप्ती, आधुनिक जगाचा इतिहास, युगांतर अकॅडमी, पुणे.जून 2025.
6)https://en.wikipedia.org
7)https://vishwakosh.marathi.gov.in